तीन

# सुलतान अलाउद्दीन खिलजी

## (इ. स. १२९६ ते इ. स. १३१६)

### खिलजी कोण होते ?

अलाउद्दीन खिलजी हा खिलजी घराण्यातीलच नव्हे तर संपूर्ण दिल्ली सुलतानशाहीच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ शासक मानला जातो. काही इतिहासकारांत खिलजींबाबत मतभेद आहेत. डॉ व्हिन्सेंट स्मिथ त्यांना 'अफगाण' किंवा 'पठाण' मानतो तर सर वूल्जले हेग त्यांना 'तुर्क' जातीचे मानतो. अलाउद्दीन खिलजीच्या समकालीन इतिहासकाराने-जियाउद्दीन बर्नीने त्यांच्याबद्दल निर्णायक स्वरूपाचे असे काही मत व्यक्त केलेले नाही. ख्वाजा निजामुद्दीन अहमद बक्षी (तबकात-ए-अकबरी) च्या मतानुसार 'खिलजी' हे चंगीझखानाचा जावई कलीजखांचे वंशज होते. कलीजखां आपल्या ३० हजार अनुयायांसह 'गोर' व जुरजिस्तानच्या खोऱ्यात राहू लागला. त्याच्या नावावरून त्यांना 'कालजी' नाव पडले. तेच पुढे बदलून 'खलजी' किंवा 'खिलजी' असे झाले. तारीख-ए-फकरुद्दीन मुबारकशाहीचा लेखक फखरुद्दीनचे असे मत आहे की, खिलजी देखील तुर्कांच्या ६४ जातींपैकी एक होते. हेच मत नंतरच्या लेखकांनीही ग्राह्य मानले आहे. डॉ. के. एस. लाल हेही खिलजींना तुर्क मानतात. अफगाणिस्तानातील 'खल्ज' नामक ठिकाणी बऱ्याच काळापासून ते राहात असल्याने त्यांच्यावर पठाण लोकांच्या रीतिरीवाजांचा बराच प्रभाव पडला होता मोहम्मद घोरीने त्यांचा प्रदेश जिंकल्यावर अनेक खिलजी तरुणांनी त्याच्या सैन्यात नोकरी पत्करली, त्यांचा पुढारी बिहार-बंगाल विजेता मोहम्मद बिन बखत्यार खिलजी हा होता. गुलाम घराण्यातील बहुतेक शासक इलबरी तुर्क जातीचे असल्याने ते खिलजींना आपल्यापेक्षा कमी दर्जाचे मानत. हळूहळू गुलामवंशी शासकांच्या राज्यात खिलजी जातीच्या लोकांचा प्रभाव वाढत गेला. कैकूबादच्या कारकीर्दीत ते बरेच शक्ति-

१. खिलजी कोण होते ?
२. अल्लाउद्दीनाचे पूर्ववृत्त,
३. प्रारंभिक अडचणी आणि त्यांचे निराकरण,
४. क्रांती व बंड,
५. क्रांती व बंडावरील उपाययोजना,
६. अल्लाउद्दीनचा ध्येयवाद,



Scanned with CamScanner

शाली झाले. त्यामुळेच कैकूबादला दूर करून त्यांच्या अंगरक्षक दलाचा प्रमुख खिलजी सरदार जलालुद्दीन फिरोज खिलजी याने इ स. १२९० मध्ये दिल्लीचे सिंहासन बळकावले.

**अलाउद्दीनाचे पूर्ववृत्त**

खिलजी घराण्यातील सर्वश्रेष्ठ शासक म्हणून ख्याती असलेला अलाउद्दीन खिलजी हा दिल्लीच्या तख्तावर खिलजी घराण्याची सत्ता स्थापन करणाऱ्या सुलतान जलालुद्दीन फ़िरोज खिलजीचा पुतण्या होता. त्याचा बाप शहाबुद्दीन हा बलबनच्या सैन्यात होता. रक्षाच्या मृत्यूनंतर जलालुद्दीनाने अलाउद्दीन व त्याच्या सर्व भावांचे पालन पोषण मोठ्या प्रेमाने केले. कालांतराने अलाउद्दीनाचे शौर्य व हुशारी पाहून आपल्या एका मुलीचे त्याच्याशी लग्न लावून दिले अलाउद्दीन निरक्षर होता. परंतु जात्याच कुशाग्र बुद्धीचा असल्याने कोणतीही गोष्ट तो सहज साध्य करू शकत असे. युद्धकलेचे त्यास उत्तम ज्ञान होते. जलालुद्दीन सुलतान झाल्यावर अलाउद्दीनाचा झपाट्याने उत्कर्ष झाला. इ. स. १२९२ मध्ये त्याने माळव्यातील भेलसा या व्यापारीदृष्ट्या संपन्न शहरावर स्वारी केली व त्यात भरपूर लूट मिळविली. या कामगिरीवर खूष होऊन जलालुद्दीनाने त्याला अवध प्रांताची सुभेदारी बहाल केली.

**अलाउद्दीनाचे सिंहासनारोहण**

भेलस्यावरील स्वारीत दक्षिणेतील देवगिरीच्या राज्याच्या संपन्नतेची ख्याती कळल्यावर अलाउद्दीनाने या राज्यावर स्वारी करण्याचे ठरविले. यावेळी तेथे रामचंद्रदेव यादव हा राजा राज्य करीत होता. चंदेरीवर स्वारी करण्याचे खोटे कारण सांगून अल्लाउद्दीनाने सुलतानाची परवानगी मिळविली. पण प्रत्यक्षात तिकडे न जाता गुप्तपणे २० हजार सैनिकांसह बुंदेलखंड आणि मध्यभारतातील घनदाट अरण्यातून मार्ग काढीत तो अचानक देवगिरीच्या सीमेवरील एलिचपूर या शहरी प्रकट झाला. रामचंद्रदेवास या स्वारीची काहीच कल्पना नसल्याने तो पूर्णपणे गाफील होता. त्याचा मुलगा शंकरदेव यावेळी ससैन्य दक्षिणेत गेला होता. अलाउद्दीनाने देवगिरीस वेढा दिला. रामचंद्रदेवाने वेळ काढण्याकरिता तहाची बोलणी चालू केली. याच सुमारास एकाएकी शंकरदेव स्वारीवरून परतल्याने तहाची बोलणी फिसकटली. उभय पक्षात झालेल्या युद्धात रामचंद्रदेव पराभूत झाला. इतिहास फरिश्ताच्या मतानुसार, या स्वारीत अलाउद्दीनास ६०० मण सोने, ७ मण मोती, २ मण हिरे. १०० मण चांदी व १००० रेशमी वस्त्रांचे ठाण इ. ची लूट व एलिचपूर परगण्याच्या वार्षिक उत्पन्नाचे आश्वासन मिळाले. अलाउद्दीनाच्या मागणीवरून रामचंद्रदेवाने आपल्या मुलीचे लग्न त्याच्याशी लावून दिले. या स्वारीसंबंधी **डॉ. ईश्वरीप्रसाद** लिहितात, "देवगिरीवरील आक्रमण मध्यकालीन भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. या आक्रमणामुळे दक्षिण भारताला निव्वळ आर्थिक हानीच पत्करावी लागली नाही तर त्यामुळे मुसलमानांना दक्षिण विजयाचा मार्गही मोकळा झाला" या मोहिमेनंतर अल्लाउद्दीनाने सत्ता हस्तगत करण्याचे ठरविले. सर्व तरुण खिलजी सरदार वृद्ध सुलतान जलालुद्दीनाच्या मवाळ व महत्त्वाकांक्षाहीन नेतृत्वाला कंटाळले होते.



अलाउद्दिनाने त्याचा फायदा घेण्याचे ठरविले. त्याने सुलतानाला कडा येथे भेटीस बोलावले पुतण्याच्या प्रेमाने आंधळा सुलतान भेटीसाठी गेला असता १९ जुलै इ. स. १२९६ रोजी मारेकऱ्यांकरवी त्याचा अलाउद्दीनाने वध करवला आणि स्वत: सुलतानपद धारण केले.

**प्रारंभिक अडचणी आणि त्यांचे निराकरण**

अल्लाउद्दीनाने पित्यासमान प्रेमळ चुलत्याचा वध केल्याने लोकमत त्याच्याविरुद्ध प्रक्षुब्ध झालेले होते जलाली अमीर सुलतानाचा वध विसरले नव्हते. वजीर अहमद चापच्या नेतृत्वाखाली या अमीरांनी अलाउद्दीनाशी सामना देण्याची जंगी तयारी चालविली होती. जलालुद्दीनाची विधवा पत्नी मलका-ए-जहान हिने आपला पुत्र इब्राहिम यास गादीवर बसवून अलाउद्दीनास विरोध करण्याकरिता सामर्थ्य एकवटण्यास सुरुवात केली. जलालुद्दीनाचा ज्येष्ठ पुत्र अर्कलीखान हा जय्यत तयारीनिशी लाहोरला होता. या व्यतिरिक्त अत्यधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिल्लीस जाऊन तेथील सत्ता व सिंहासन प्राप्त करण्याचे कार्य अपुरेच राहिलेले होते. लौकिकदृष्ट्या दिल्लीचा ताबा मिळविणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होती. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन अलाउद्दीनाने दिल्लीचा मार्ग धरला. त्याच्या प्रबळ सामर्थ्यापुढे त्याचे काही विरोधक पळून गेले तर काहींनी शरणागती पत्करली. ३ ऑक्टोबर इ. स. १२९६ रोजी एका विशाल सैन्यासह मोठ्या मानमरातबाने अलाउद्दीनाने दिल्लीत प्रवेश केला. प्रजा व सरदारवर्गाची सहानुभूती मिळविण्याकरिता त्याने अक्षरश: पाण्यासारखा पैसा खर्च केला.

त्याने आपल्या चाहत्यांना व समर्थकांना दरबारातील उच्च जागा व पदव्या दिल्या. शेख व उलेमांना मोठमोठ्या देणग्या देण्यात आल्या. जलालुद्दीनाचे पुत्र इब्राहीम व अर्कलीखान यांना कैद करण्यात आले. पुढे कैदेतच या दोघांचा अंत झाला. अशा रीतीने अपार संपत्तीच्या जोरावर अलाउद्दीनाने प्रजा व सरदारवर्गाचा पाठिंबा मिळवून परिस्थितीवर मात केली. सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यानंतर त्याने आपले खरे स्वरूप दाखविण्यास सुरवात केली. ज्या जलाली अमीरांनी त्याला मदत केली होती, त्यांच्यावर त्याने राजद्रोहाचे आरोप ठेवले त्यांना नाना तऱ्हेच्या शिक्षा देऊन त्याची सर्व संपत्ती त्याने हरण केली

**क्रांती व बंडे**

अलाउद्दीनाच्या कारकीर्दीच्या प्रारभिक काळात अनेक वेळा सुलतानाचे प्राण घेण्याचे व त्याची सत्ता उलथून पाडण्याचे प्रयत्न झाले. इ. स. १३०५ मध्ये गुजराथवरील स्वारीत नव-मुस्लिमांनी लुटीच्या वाटणीवरून सुलतानाविरुद्ध बंड पुकारले. सुलतानाचा पुतण्या अकातखान आणि भाचे अमीर उमर व मंगूखान यांनी त्याच्याविरुद्ध शस्त्र उगारले. दिल्लीत हाजी मौलाने उठाव केला. सुलतानाने ही सर्व बंडे मोडून काढली. ही बडे कां होतात याची कारणे शोधून काढण्याकरिता त्याने राज्यातील वृद्ध, अनुभवी व विद्वान लोकांशी चर्चा केली. या चर्चेतील फल- निष्पत्तीतून त्याला असे आढळून आले की–



Scanned with CamScanner

(१) राज्यातील गुप्तहेर खात्याच्या अकार्यक्षमतेमुळे राज्यात घडणाऱ्या घटनांची माहिती सुलतानास मिळत नाही.

(२) राज्यातील अमीर व उच्चाधिकारी यांचे परस्परांतील सामाजिक संबंध विवाह व मेजवान्यांनी वाढले आहेत. त्यामुळे ते एकत्रित येऊन सुलतानाच्या सत्तेविरुद्ध कारस्थाने करतात.

(३) राज्यात मद्यपानाचे प्रमाण वाढले आहे. मद्याच्या धुंदीत लोक सुलतानाविरुद्ध काहीही बरळतात.

(४) लोकांजवळ अत्यधिक प्रमाणात द्रव्यसंग्रह असल्याने त्यांना विचार करावयास भरपूर वेळ मिळतो; असे लोक धन व कालापव्यय करून राज्यसत्तेविरुद्ध गुप्तपणे कारस्थाने करतात

**क्रांती व बंडांवरील उपाययोजना**

**वरील** दोषांचे निराकरण करण्याकरिता सुलतानाने पुढीलप्रमाणे उपाययोजना **केली.** त्याने बलबनाप्रमाणेच हेरखाते अत्यंत कार्यक्षम केले. सार्वजनिक महत्त्वाच्या **ठिकाणी,** सरकारी कार्यालये, दरबारी व अमीर-उमरावांच्या घरी अत्यंत कार्यक्षम **हेरांच्या** नेमणुका करण्यात आल्या. हे हेर साम्राज्यात घडणाऱ्या घटना सुलतानास कथन **करीत.** दरबारातील अमीर-उमरावांनी एकत्र बसून चर्चा करण्यावर व त्यांच्या सरकार-**विरोधी** कार्यावर कडक नियंत्रणे बसविण्यात आली. सुलतानाच्या परवानगीशिवाय आपल्या मुलामुलींचे परस्पर विवाह ठरविणे, मेजवान्या आयोजित करणे निषिद्ध ठरविले. **मद्यपानच** सर्व लोकांना बेकायदेशीर कार्य करण्यास चालना देते असे समजून अलाउद्दीनाने **राज्यात** सर्वत्र दारूबंदी जाहीर केली. त्याने स्वतःही दारू पिणे सोडून दिले. यासंबंधी **सरकारी** नियम तयार करण्यात आले. हे नियम तोडणाऱ्यास अत्यंत कठोर शिक्षा केल्या **जात असत.** अलाउद्दीनाने पूर्वीच्या सुलतानांच्या अमदानीत लोकांना धर्मार्थ व बक्षीस **स्वरूपात** दिलेल्या जमिनी खालसा करून, पेन्शन व आर्थिक मदत बंद केली.

**अलाउद्दीनाचा ध्येयवाद :** अलाउद्दीन फार महत्त्वाकांक्षी होता. आयुष्यात मिळा-लेल्या प्रारंभिक यशाने त्याचा आत्मविश्वास वाढत गेला. तो नानातऱ्हेची मनोराज्ये रचू लागला. मोहम्मद पैगंबराप्रमाणे नवीन धर्म स्थापन करण्याची व शिकंदराप्रमाणे विश्व-विजय मिळविण्याची प्रबळ इच्छा त्याच्या मनात डोकावू लागली. बर्नी याबद्दल लिहितो, "परमेश्वराने पैगंबरसाहेबांना चार मित्र दिले होते, ज्यांच्या मदतीने त्यांनी धर्माची स्थापना केली. या धर्मस्थापनेमुळे पैगबरसाहेबांचे नाव कयामतपर्यंत कायम राहू शकेल. ईश्वराने मलादेखील चार मित्र दिले आहेत. उलूगखां, जाफरखां, नुसरतखां आणि आलमखां जे माझ्या ऐश्वर्याच्या प्रभावामुळे राजसी थाटामाटात राहात आहेत. माझ्या मनात आले तर त्यांच्या मदतीने मी एक नवीन धर्म अथवा पंथ सुरू करू शकतो. त्यामुळे माझ्यासह माझ्या मित्रांचे नावही पैगंबरसाहेब व त्यांच्या मित्रांप्रमाणे कयामतच्या दिवसांपर्यंत राहू शकेल." "......माझ्याजवळ अफाट संपत्ती, असंख्य हत्ती व सैन्य आहे माझी अशी इच्छा



आहे की, एखाद्याला दिल्लीला आपला प्रतिनिधी म्हणून ठेवून थोर शिकंदरप्रमाणे विश्व-विजयासाठी बाहेर पडावे आणि संपूर्ण जगावर आपली सत्ता प्रस्थापित करावी." यासंबंधी अलाउद्दीन खिलजी व समकालीन इतिहासकार जियाउद्दीन बरनीचा चुलता काजीअला-उल् मुल्क यांच्यात झालेली चर्चा फार मनोरंजक आहे. अलाउद्दीनाच्या मनोराज्यावर निस्पृहपणे आपले मत देताना काजीअला-उल् मुल्क असे म्हणतो की, "धर्म व नीती ईश्वरी साक्षात्कारामुळेच मानवात प्रगट झालेल्या पाहावयास मिळतात. मानवी कल्पना अथवा योजनांच्याद्वारे त्यांची स्थापना होत नाही. अॅडम आणि ईव्हच्या काळापासून आजतागायत हे कार्य केवळ देवदूत अथवा पैगंबरांनीच केलेले आहे. ज्याप्रमाणे शासन व सुव्यवस्था ही राजांची कर्तव्ये मानली जातात, त्याचप्रमाणे धर्म व नीतीही पैगंबरांचीच कार्ये होत. काही पैगंबरांनी शासकांची कार्ये अवश्य केलेली आहेत. परंतु राजे पैगंबर झाल्याची उदाहरणे मात्र आढळलेली नाहीत. जोपर्यंत ईश्वरी सत्ता विद्यमान आहे तोपर्यंत राजे कधीही पैगंबर होऊ शकणार नाहीत. मला असे वाटते की, या विषयावर आपण अधिक चर्चा न केलेली बरी. आपणास हे माहीत आहे की, चंगीझखानाने मुसलमानांच्या शहरात रक्ताचे पाट वाहविले, परंतु मुसलमानात तो कधीही मंगोल धर्म किंवा संस्कृतीचा प्रसार करू शकला नाही. शेकडो मंगोल मुसलमान झालेले आहेत, परंतु कोणीही मुसलमान व्यक्ती मंगोल झाल्याचे उदाहरण उपलब्ध नाही." विश्वविजयासंबंधी हाच काजी अलाउद्दीनाला पुढे असा उपदेश करतो की, "विश्वविजयाची इच्छा करणे हा राजाचा धर्म आहे, परंतु ही वेळ सिकंदराच्या वेळेसारखी नाही. शिकंदराप्रमाणे आपल्याकडे अॅरिस्टॉटलसारखा बुद्धि-मान व दूरदर्शी मंत्रीही नाही. रणथंभोर, चितोड, माळवा, धार व उज्जैन इ. प्रदेश अद्याप स्वतंत्र आहेत. बाह्य संकटांचे कृष्णवर्णीय मेघ घोंघावत आहेत. म्हणून प्रचलित परिस्थिती-कडे पाहता ह्यावेळी आपण दोन उद्देश डोळ्यासमोर ठेवले पाहिजेत. (१) संपूर्ण भारत जिंकणे व (२) मंगोल स्वाऱ्यांचा बंदोबस्त करणे. त्यासाठी आपणाला दारू पिणे व हास्यविनोद करणे सोडले पाहिजे. तरच हे दोन्ही उद्देश सफल होतील." काजीचा उप-देश अलाउद्दीनाला फारच मानवला. तो सूज्ञ, व्यवहारदक्ष व समजूतदार होता. त्यामुळे त्याने आपले ध्येय बाह्य आक्रमणापासून देशाचे संरक्षण करणे आणि साम्राज्यविस्तार करून देशात शांतता, सुरक्षितता व सुव्यवस्था करण्याचे ठरविले.

## अलाउद्दीनाचा साम्राज्यविस्तार

अलाउद्दीनाच्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणाचे दोन भागात (अ) उत्तर भारत व (ब) दक्षिण भारत विजय, असे विभाजन करता येते.

(अ) उत्तर भारत विजय

(१) गुजराथवर स्वारी (इ.स. १२९७-१२९९) : गुजराथ प्रांत भौगोलिक व व्यापारिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध होता. तेथे वघेल वंशातील रायकर्णसिंह नावाचा राजा



Scanned with CamScanner

अलाउद्दीनाचा साम्राज्यविस्तार—
अ–उत्तर भारत विजय–
१. गुजराथवर स्वारी (१२९७.९९)
२. रणथंभोर (१२९९–१३०१),
३. मेवाड (१३०३–१३०४),
४. अन्य विजय.
ब–दक्षिण भारत विजय–
अलाउद्दीन खिलजीचे दक्षिण धोरण, उद्देश.
१. मलिक काफूरची पहिली स्वारी, रामचंद्रदेवाचा पराभव (१३०६–०७)
२. मलिक काफूरची दुसरी स्वारी वारंगळ विजय (१३०८),
३. मलिक काफूरची तिसरी स्वारी– (१३१०–१३१२),
अ– द्वारसमुद्र विजय (१३१०),
ब– मदुरा (१३१२),
४. मलिक काफूरची चवथी स्वारी (१३१३),
अलाउद्दीनाच्या दक्षिणेतील विजयाची कारणे.
अलाउद्दीनाच्या दक्षिण हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांचे परिणाम.

राज्य करीत होता. अलाउद्दीनाचे सेनापती उलुघखान व नुसरतखान यांनी गुजराथवर स्वारी करून राय कर्णसिंहास पिटाळून लावले. गुजराथेतील प्रसिद्ध शहरे अन्हिलवाड, सोमनाथ व भडोच इ. लुटण्यात आली. कर्णसिंहाची सुंदर पत्नी कमलादेवी आणि मलिक काफूर-हजारदिनारी यांना दिल्लीला सुलतानाकडे पाठविण्यात आले. अलाउद्दीनाने कमलादेवीशी विवाह लावला. उलुघखानास गुजराथची सुभेदारी बहाल करण्यात आली.

(२) रणथंभोर (इ.स. १२९९–१३०१): येथील शासक राणा हमीर होता. हमीरने गुजराथेतून पळून आलेल्या नव मुस्लिमांचा बंडखोर नेता मीर मोहम्मदशहा याला आश्रय दिला होता. म्हणून सुलतानाची राणावर वक्रदृष्टी होती. रणथंभोरवरील स्वारीत सुलतानाचा शूर सरदार नुसरतखान हा मारला गेला. यामुळे अलाउद्दीन स्वतः मोर्चावर गेला. सुलतानाने हमीरचा दिवाण रणमल्ल यास मुबलक पैसा चारून फितुरीने किल्ला हस्तगत केला (इ. स. १३०१). या लढाईत सर्व राजपूत ठार मारले गेले. त्यांच्या स्त्रियांनी जोहार केला.

(३) मेवाड (इ स १३०३–१३०४) : मेवाडमध्ये महाराणा रत्नसिंहाचे राज्य होते. रत्नसिंहाची पत्नी पद्मिनी ही आपल्या अनुपम सौन्दर्याकरिता संपूर्ण देशात प्रख्यात होती. असे म्हणतात की, इ.स. १३०३ मध्ये पद्मिनीच्या प्राप्तीच्या लालसेने अलाउद्दीनाने मेवाडवर स्वारी केली, पण आधुनिक इतिहासकारांनी सौन्दर्यशालिनी पद्मिनीच्या आरशातील प्रतिबिंबदर्शनाची कथा कपोलकल्पित मानलेली आहे. पहिल्या वर्षी सुलतानास किल्ला घेण्यात यश आले नाही, म्हणून दुसऱ्या वर्षी त्याने पुनः नेटाने किल्ल्याला वेढा दिला. या वेढ्यामुळे राजपुतांची अत्यंत कुचंबणा होऊ लागली. त्यांच्या रसदेचे सर्व मार्ग बंद झाले. शेवटी केशरी वस्त्रे धारण करून ते मुसलमानांवर तुटून पडले, राजपूत स्त्रियांनी सतित्वरक्षणार्थ पद्मिनीच्या नेतृत्वात जोहार केला. किल्ला जिकल्यानंतर तेथील



सर्व नागरिकांची कत्तल करण्यात आली. चित्तोडचे नाव बदलून खिज्राबाद करण्यात आले. राजपुत्र खिजरखानला चित्तोडला नेमून सुलतान परत गेला.


(४) अन्य विजय : यानंतर सुलतानाने जालोर व माळवा (इ.स. १३०५), मारवाड (१३०८) इ. प्रदेश जिंकले. फलस्वरूप राजपुताना आणि शेष उत्तर भारत सुलतानाच्या ताब्यात आला.

**(ब) दक्षिण भारत विजय**

**अलाउद्दीन खिलजीचे दक्षिण धोरण : उद्देश :** दक्षिण भारतावर अलाउद्दीनाने स्वारी करण्यामागे त्याची महत्त्वाकांक्षा व साम्राज्यपिपासाच जबाबदार होती. उत्तर भारत जिंकल्यानंतर त्याची दृष्टी दक्षिण भारताकडे वळली. तसे पाहता चुलत्यांच्या कारकीर्दीत त्याने देवगिरीच्या रामचंद्रदेवावर स्वारी करून येथून अपार संपत्ती प्राप्त केली होती. दक्षिणेतील चारी प्रमुख राज्ये परस्परांतील भांडणामुळे सत्त्वहीन झाली होती. अलाउद्दीनाला दक्षिणेतील राजकीय अंदाधुदीचे पूर्ण ज्ञान होते. दक्षिणेतील संपत्तीनेही सुलतानाचे लक्ष आकर्षित केले होते. अलाउद्दीनाचे स्थायी सैन्य संख्येने प्रचंड होते. या सैन्याला सतत कार्यमग्न ठेवण्याकरिता सुलतानाने दक्षिणेकडे त्याची रवानगी केली. इ.स. १२९३ मध्ये अलाउद्दीनाने गुजराथ जिंकून तेथील शासक राजा कर्णसिहाला पराभूत करून त्याची पत्नी कमलादेवीशी स्वतः निका लावला. राणा कर्णसिह व त्याची मुलगी देवलदेवी यांनी नंतर देवगिरीच्या रामचंद्रदेवाचा आश्रय घेतला. कमलादेवीला देवलदेवीच्या भेटीची उत्कट इच्छा होती. ही इच्छा पूर्ण करण्यास दक्षिणेवर स्वारी करणे आवश्यक ठरले. एकंदरीत दक्षिणेतील सर्व राज्यांना आपले मांडलिक बनवून संपूर्ण भारतात एकछत्री अंमल स्थापन करण्याचे महान स्वप्न अलाउद्दीनच्या डोळ्यापुढे होते. दक्षिण विजयाची कामगिरी त्याचा सेनापती मलिक काफूर हजार दिनारी याने यशस्वीपणे पार पाडली.

उत्तर भारतात आपली सत्ता स्थापन केल्यानंतर अलाउद्दीन दक्षिण भारताकडे वळला. यावेळी दक्षिणेत देवगिरी (यादव), तेलंगणा (काकतीय), द्वार समुद्र (होयसळ) व मदुरा (पांड्य) ही चार प्रमुख हिंदू राज्यें होती परस्परांतील वैमनस्य व संघर्षामुळे ही राज्ये अत्यंत कमकुवत व सत्त्वहीन झाली होती. सुलतानाने या राज्यास आपले मांडलिक बनविण्याचा निश्चय केला. त्याची ही इच्छा त्याचा सेनापती मलिक काफूर हजार दिनारी याने पूर्ण केली

**(१) मलिक काफूरची पहिली स्वारी : रामचंद्रदेवाचा पराभव** (इ. स. १३०६–१३०७) देवगिरीच्या रामचंद्रदेवाने तीन वर्षापासून खंडणी दिली नव्हती. तसेच त्याने गुजराथचा पदच्युत राजा रायकर्णसिह बघेल याची मुलगी देवलदेवीशी आपला मुलगा शंकरदेवाचा विवाह करण्याचे प्रयत्न चालविले होते. कमलादेवीची इच्छा मुलीस दिल्लीला आणण्याची होती. अलाउद्दीनाच्या आज्ञेवरून गुजराथचा सुभेदार अलपखान याने देवगिरीकडे जाण्यास निघालेल्या देवलदेवीला एलोराजवळ मोठ्या चातुर्याने पकडून दिल्लीला पाठवून दिले. पुढे तिचा विवाह अलाउद्दीनाचा मुलगा खिजरखान याच्याशी लावण्यात आला. रामचंद्रदेवाच्या बंदोबस्तास मलिक काफूरला पाठविण्यात आले. काफूरने रामचंद्र-




देवास पकडून दिल्लीस सुलतानाकडे धाडले. अलाउद्दीनाने त्याचा सत्कार करून त्यास 'रायरायान' अशी पदवी दिली आणि वर्षभरानंतर मोठ्या सन्मानाने देवगिरीस त्याची रवानगी केली. अलाउद्दीनाच्या उदार वागणुकीने प्रभावित झालेल्या रामचंद्रदेवाने पुन्हा बंड केले नाही.

**(२) मलिक काफूरची दुसरी स्वारी (वारंगळ इ. स. १३०८) :** वारंगळ येथे काकतीय वंशातील प्रतापरुद्रदेव उर्फ 'लद्दरदेव' हा राज्य करीत होता. रामचंद्रदेवाच्या मदतीने मलिक काफूरने वारंगळच्या किल्याला वेढा दिला. अल्पशा विरोधानंतर राजाने शरणागती पत्करून अलाउद्दीनाशी तह केला. त्याने सुलतानाचे आधिपत्य स्वीकारून वार्षिक खंडणी देण्याचे कबूल केले.



**(३) मलिक काफूरची तिसरी स्वारी (इ.स. १३१०–१३१२) :** (अ) द्वारसमुद्र-येथील होयसळवंशी राजा वीर बल्लाळ द्वितीय आणि रामचंद्रदेव यादव यांचे परस्परात वैमनस्य होते. अगदी अनपेक्षितरीत्या काफूरने द्वारसमुद्रवर हल्ला करून राजधानीची नासाडी केली. राजाने काफूरला बरेच द्रव्य देऊन आपला जीव वाचविला व अलाउद्दीनाचे मांडलिकत्व पत्करले.

(ब मदुरा इ. स. १३१२) : येथील राजपुत्र सुंदर पांड्य व वीर पांड्य ह्यांच्यात गादीकरिता कलह सुरू होता सुंदर पांड्यने अलाउद्दीनाची मदत मागितली. त्याच्या वतीने मलिक काफूरने मदुरेला वेढा देताच वीर पांड्य तेथून पळून गेला. या स्वारीत काफूरने मदुरा ते रामेश्वरपर्यंतच्या प्रदेशातील शेकडो मंदिरे नष्ट करून त्यांच्या भग्नावशेषांवर अनेक मशिदी बांधल्या. स्वारीत मिळालेली अपार संपत्ती बरोबर घेऊन काफूर दिल्लीस परतला. या संपत्तीचे मूल्य १० कोट टंका होते. त्यात ३२१ हत्ती, २० हजार घोडे व २७५० पौं. सोने होते.

**(४) मलिक काफूरची चवथी स्वारी (इ. स. १३१३) :** रामचंद्रदेवाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा शंकरदेव हा गादीवर आला होता. अलाउद्दीनाबद्दल त्याचे मन कलुषित असल्याने त्याने खंडणी देणे बंद केले होते. त्यामुळे सुलतानाने काफूरला देवगिरीवर स्वारी करण्यास पाठविले. या लढाईत शंकरदेवाचा पराभव होऊन तो मारला गेला. शेवटी राज्याची सूत्रे रामचंद्रदेवाचा जावई हरपालदेव ह्याच्या स्वाधीन करून काफूर दिल्लीस परत आला. या मोहिमेत प्रतापरुद्रदेव व तिसऱ्या वीर बल्लाळदेवाकडूनही बरीच खंडणी व अनेक नवीन प्रदेश काफूरने लुटले.

**अलाउद्दीनाच्या दक्षिणेतील विजयाची कारणे :** अल्पावधीत नर्मदा ते कन्याकुमारीपर्यंत अलाउद्दीनाने आपले प्रभुत्व स्थापन केले. या मोहिमेत त्याला विजय मिळण्यास अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या. दक्षिणेतील राज्ये परस्परांतील भांडणांमुळे शत्रूविरुद्ध संघटित होऊन संयुक्तपणे लढा देऊ शकली नाहीत. हिंदू राज्यातील दुहीमुळेच अलाउद्दीन विजयी ठरला. त्याच्या महत्त्वपूर्ण लष्करी सुधारणांमुळे त्याचे सैनिकसामर्थ्य प्रचंड स्वरूपात वाढले होते. त्याचे सैन्य सुसंघटित व अनुशासनबद्ध होते. या सैन्याला मलिक काफूरसारख्या मुरब्बी व कसलेल्या सेनापतीचे नेतृत्व लाभले होते. या सैन्यात धार्मिक जोश व लुटीची भावना प्रज्वलित करण्यात आली होती. त्या मानाने दक्षिणेतील हिंदू राजांच्या फौजा अगदीच कुचकामी होत्या. त्यामुळे त्यांच्यावर विजय मिळविणे सुलतानाच्या फौजांना फारसे कठीण गेले नाही. उपरोक्त विविध कारणांमुळेच दक्षिणेतील स्वाऱ्यांत सुलतानाला अमाप यश लाभले. प्रत्येक स्वारीत तो विजयी ठरला.

**अलाउद्दीनाच्या दक्षिण हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांचे परिणाम :** दक्षिण भारतातील अनेक स्वाऱ्यांत अलाउद्दीनाला अक्षरशः अफाट संपत्ती लुटीत मिळाली होती. याच अतुल धनराशीच्या जोरावर त्याने आपली प्रचंड फौज संघटित व शस्त्रसज्ज केलेली होती. या विशाल सैन्याचा खर्च, मंगोल स्वाऱ्यांचा बंदोबस्त व उत्तर भारतातील सत्तासंघटनासाठी दक्षिणेतील धनाचा त्याला फार उपयोग झाला. याच अपार संपत्तीमुळे त्याच्या



Scanned with CamScanner

वारसांना कोणत्याही प्रकारच्या आर्थिक संकटांना तोंड देण्याची वेळ आली नाही. स्वतःच्या वैयक्तिक चैन व विलासातच त्यांनी तो खर्च केली. रामचंद्रदेव व द्वारसमुद्रचा राजा तिसरा वीर बल्लाळदेव हे दोघेही हिंदू राजे अलाउद्दीनाचे समर्थक झाल्याने त्याची कीर्ती वाढली. अलाउद्दीनाच्या दक्षिणेवरील स्वाऱ्यांमुळे तेथील प्रजेला मात्र जबर आर्थिक हानी सोसावी लागली. त्यांच्या शासकांना खंडणीच्या मोठमोठ्या रकमा सुलतानाला द्याव्या लागत असल्याने त्याची भरपाई करण्याकरिता त्यांनी प्रजेवर अनेक डोईजड कर लावले. त्यामुळे व्यापारव्यवसायांचीही जबर हानी झाली. हिंदूची अनेक सुप्रसिद्ध देवालये व पाठशाळा नष्ट करण्यात आल्या. दक्षिण विजयाचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम हजारो हिंदू मुसलमान होण्यात झाला. हळूहळू त्यांची संख्या वाढली त्यामुळे उत्तरेप्रमाणे दक्षिण भारतातही इस्लाम धर्म व त्याच्या संस्कृतीचा झपाट्याने प्रसार झाला. अलाउद्दीनाच्या दक्षिण धोरणाचे वैशिष्ट्य हे आहे की, त्याने तेथील राज्यांना आपल्या साम्राज्यात विलीन न करता त्यांना मांडलिकत्वाचा दर्जा देऊन त्यांच्याकडून फक्त खंडणी वसूल केली दक्षिणेतील राज्यांना त्याने पूर्णपणे अंतर्गत स्वायत्तता दिली होती. त्यामुळं प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या जबाबदारीतून तो मुक्त झालेला होता. यात त्याचे राजकीय शहाणपण ठळकपणे दिसून येते. पुढे तुघलक सुलतानांनी ही राज्ये खालसा करून आपल्या साम्राज्यात प्रविष्ट केलो पुरेशी साधने नसताना जबाबदारी वाढविणे धोक्याचे ठरते. देश मोठा, त्यात मध्ययुगात दळणवळणाच्या साधनांचा अभाव होता. त्यामुळे अल्पावधीतच तुघलक साम्राज्य खंडप्राय झाले. तुघलकांचे उदाहरण पाहता अलाउद्दीनाचे धोरण किती अचूक होते हे स्पष्टपणे दिसून येईल.

**अलाउद्दीनाचे मंगोल धोरण :** अलाउद्दीनाचा दुसरा हेतू मंगोल आक्रमणापासून देशांचे संरक्षण करण्याचा होता. इ. स. १२९६-१२९७ मध्ये झालेल्या मंगोल स्वाऱ्या सेनापती जाफरखान याने शौर्याने परतवून लावल्या. इ. स. १३०३ मध्ये तारदीबेगच्या नेतृत्वाखाली मंगोलांनी थेट दिल्लीच्या जवळपास लुटालूट केली. सतत होणाऱ्या मंगोल आक्रमणांनी अलाउद्दीन खडबडून जागा झाला. त्याने आपल्या सरहद्दविषयक धोरणात अनेक महत्वाचे फेरबदल केले. पंजाब, सिंध आणि सुलतान प्रांतातील जुन्या किल्ल्यांची डागडुजी करण्यात आली. या व्यतिरिक्त अनेक नवीन सुदृढ किल्ले बांधण्यात आले. सरहद्दीचा बंदोबस्त ठेवण्याकरिता एका सुयोग्य माणसाची 'सुरक्षाधिकारी' (Warden of Marches) म्हणून नेमणूक करण्यात आली. या अधिकाऱ्याच्या ताब्यात शस्त्रास्त्रांनी सुसज्जित अशी विशाल सेना देण्यात आली. त्यामुळेच इ. स. १३०८ पर्यंत येणाऱ्या मंगोलांचा मलिक काफूर व गाझी मलिक हे पराभव करू शकले.

अलाउद्दीनाचे मंगोल धोरण,
अलाउद्दीनाचे हिंदूविषयक धोरण,
न्यायव्यवस्था,
सैन्यव्यवस्था,
आर्थिक धोरण
वस्तूंचे मूल्यनियंत्रण,
अलाउद्दीनाचा मृत्यू (२ जाने. १३१६),
अलाउद्दीनाची राज्यसत्तेसंबंधी कल्पना,
योग्यता– अलाउद्दीन हा सुलतानशाहीतील सर्वश्रेष्ठ शासक होता काय ?



**अलाउद्दीनाचे हिंदूविषयक धोरण :** अलाउद्दीन हिंदूचा कट्टा द्वेष्टा होता. हिंदूंना त्याने अत्यंत निर्दयतेची वागणुक दिली. त्यांनी वड करू नये म्हणून त्यांचे सर्वस्व हरण करण्याचा त्याने निश्चय केला. याकरिता त्याने अनेक जाचक नियम तयार केले. हिंदू शेतकऱ्यांकडून उत्पन्नाचा अर्धा भाग शेतसारा म्हणून घेण्यात येई. त्याशिवाय त्यांच्याजवळ असलेल्या पशू, घरे व कुरणे यांवरही कर बसविण्यात आले. हिंदूंकडून सक्तीने जिझिया कर घेण्यात येई. त्यांची स्थिती अत्यंत दयनीय होती. घोड्यावर बसणे, शस्त्रास्त्रे बाळगणे, उत्तम वस्त्रें वापरणे व धार्मिक उत्सव साजरे करणे इ. गोष्टींची हिंदूंना मनाई होती. अलाउद्दीनाच्या निष्ठुर व जुलमी धोरणाने त्याची हिंदू प्रजा अत्यंत त्रस्त झालेली होती. आर्थिकदृष्ट्या त्यांचे पूर्णरूपेण शोषण होऊन त्यांना हेतुपुरस्सर कफल्लक करण्यात आले.

सुलतानाचे हिंदूविषयक धोरण काझी अला-उल्-मुल्क या धर्मांध माणसाच्या सल्ल्यावरून आखण्यात आले होते. या कट्टर काझीच्या मतानुसार "हिंदूचे काम कर देण्याचे आहे. सरकारी अधिकारी जर त्यांच्याजवळ चांदीचे नाणे मागत असेल तर त्याने सोन्याचे नाणे काढून द्यावे. जर त्या अधिकाऱ्याने थुंकण्याची इच्छा प्रदर्शित केली तर हिंदूंनी लागलीच तोंडाचा आ करावा." या भयंकर जाचापायी आपल्या पोटापाण्याची सोय करण्यासाठी हिंदूंना इतके जबर श्रम पडत असत की, सुलतानाविरुद्ध कट अथवा बंड करण्याचा विचार करण्याइतकेही त्राण त्यांच्यात राहिले नव्हते. समकालीन इतिहासकार **जियाउद्दीन बरनी** असे लिहितो की, "चौधरी, खोत व मुकादम यांची परिस्थिती अशी दारुण होती की, त्यांच्या बायकांना गरिबीमुळे पोट भरण्याकरिता मुसलमानांच्या घरी मोलमजुरीची हलकीसलकी कामे करण्याकरिता जावे लागत असे."

**न्यायव्यवस्था :** अलाउद्दीनाने न्यायदानाच्या पवित्र कार्याकरिता काझींच्या नेमणुका केल्या होत्या. गुन्हेगारांस शिक्षा देण्याकरिता नवीन दंडविधान तयार करण्यात आले. पोलीस व गुप्तहेरांच्या साहाय्याने अपराध्यांची चौकशी करून काझी मुसलमानी कायद्यानुसार निकाल देत. क्वचित प्रसंगी सुलतानही उलेमांच्या मदतीने न्याय देण्याचे कार्य करीत असे न्यायदानाच्या क्षेत्रात मुसलमानी कायदा प्रचलित असल्याने बहुसंख्य हिंदू प्रजेला काय न्याय मिळत असेल हे सांगणें नकोच.

**सैन्य व्यवस्था :** अलाउद्दीनाचे ध्येय साम्राज्यविस्तार करणे, परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करणे, देशात शांतता व सुव्यवस्था स्थापण्याचे होते. या ध्येयपूर्तीकरिता प्रचंड सैन्याची आवश्यंकता होती. त्यामुळे तत्कालीन सैन्यव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन करणे अवश्यभावी होते, सैन्याचे पुनर्गठन, शिस्त, संख्या व कार्यक्षमतेच्या बाबतीत अलाउद्दीनाने बलबनवर ताण केली.



Scanned with CamScanner

अलाउद्दीनाने सैन्यव्यवस्थेकरिता 'दिवाण-ए-आरीज' हा एक स्वतंत्र विभाग कायम केला. त्याने लष्करात सुयोग्य अधिकारी व उत्तम सैनिकांचा भरणा केला. मौर्य सम्राटां-प्रमाणे अलाउद्दीनानेही राज्याचे स्थायी सैन्य ठेवले होते. राजधानीत ४,५०,००० सैन्य सदैव जय्यत तयार असे सर्व सैनिकांना रोख वेतन देण्यात येई. साधारणपणे अलाउद्दीनाच्या फौजेतील सैनिकांच्या दर्जानुसार तीन श्रेणी होत्या. पहिल्या श्रेणीतील सैनिकाला दोनपेक्षा अधिक घोडे ठेवावे लागून त्याला २३४ टंका वार्षिक पगार मिळे. द्वितीय श्रेणीतील सैनिकाला दोन घोडे ठेवण्याच्या मोबदल्यात १५६ टंका वार्षिक व तृतीय श्रेणीच्या सैनिकाला एक घोडा ठेवल्यास ७८ टंका वार्षिक असा पगार दिला जाई. कोणत्याही सैन्याधिकाऱ्याला अथवा सैनिकाला पगाराच्याऐवजी जहागीर देण्याची प्रथा सुलतानाने पूर्णपणे बंद केली होती. सैनिकांची मोजदाद ठेवण्याकरिता अलाउद्दीनाने चेहरा रजिस्टर ठेवण्याची पद्धत अमलात आणली. सरकारदप्तरी सैनिकाचे नाव, रंग, चेहरा अथवा शरीरावरील विशिष्ट खाणाखुणा यांची लेखी माहिती नोंदविली जाई. या सोयीमुळे कोणताही सैनिक युद्धसमयी गैरहाजर राहू शकत नसे. सरकारी घोड्यांची अदलाबदल होऊ नये म्हणून घोड्यांना डाग देण्याची पद्धत त्याने प्रचलित केली. अलाउद्दीनाच्या लष्करी संरक्षणव्यवस्थेत किल्ल्यांनाही महत्त्वाचे स्थान होते. खुद्द त्याच्याच कारकीर्दीत मंगोलांनी अनेक वेळा भारतावर आक्रमणे केली. म्हणून त्याने सीमा प्रदेशातील जुन्या किल्ल्यांची डागडुजी करून अनेक नवीन किल्ले बांधले. सदर किल्यात त्याने अनुभवी सेनापती व लढाऊ सैनिकांच्या नेमणुका केल्या. त्यामुळे परचक्रापासून तो देशाचे रक्षण करू शकला. अलाउद्दीनाने सैन्यव्यवस्थेत वरील क्रांतिकारी सुधारणा घडवून सैन्याचा कायापालट केला. सुलतानाच्या लष्करी सुधारणा त्या काळात निःसंशय प्रशंसनीय होत्या. ह्याच प्रचंड लष्करी सामर्थ्यावर त्याने आपल्या विशाल साम्राज्याची उभारणी केली होती.

**आर्थिक धोरण :** अलाउद्दीन निरंकुश व स्वेच्छाचारी शासक होता. लोकांची बंड करण्याची प्रवृत्ती मोडून काढण्याकरिता त्याने त्यांची सर्व संपत्ती हरण करण्याचे ठरविले. त्याने जहागिरीची प्रथा समाप्त केली. धार्मिक संस्था, वक्फ; इनाम, व पेन्शन या प्रीत्यर्थ दिलेल्या सर्व जमिनी खालसा करून त्याने त्यावर राज्याची मालकी स्थापन केली. सर्वप्रथम अलाउद्दीनानेच जमिनीची मोजणी करण्याची पद्धत अमलात आणली. जमिनीच्या उत्पादनक्षमतेनुसार भूमिकर आकारण्यात येऊ लागला. हिंदूंकडून शेतसारा उत्पन्नाचा १/२ घेण्यात येई. तर मुसलमानाकडून शेतसारा उत्पन्नाच्या १/४ घेण्यात येई. जमीनमहसुलाबरोबरच घरपट्टी, कुरणपट्टी व पशुकर इ. कर घेतले जात असत, अलाउद्दीनाने महसूल विभागातील हिंदु अधिकारी-चौधरी, खोत व मुकादम यांना देण्यात येणाऱ्या परंपरागत सवलती बंद केल्या. शेतसारा रोख अथवा धान्यरूपात देण्याची मुभा होती. अल्लाउद्दीनाच्या आर्थिक धोरणाचा बहुसंख्य हिंदू रयतेवर फार वाईट परिणाम झाला, अत्यधिक कर-वसुलीने ते अक्षरशः कंगाल झाले.



**वस्तूंचे मूल्य नियंत्रण :** बाह्य आक्रमणापासून देशाचे रक्षण करणे, साम्राज्यविस्तार करून देशात राजकीय स्थैर्य व सुव्यवस्था स्थापन करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. या हेतुसिद्धर्थ एका विशाल व सुसज्जित सैन्याची नितांत आवश्यकता होती परंतु राज्यातील उत्पन्नाची साधने या प्रचंड सैन्याचा खर्च भागविण्यास अपर्याप्त होती. म्हणून त्याने एका मार्गाने राज्यातील करांचे प्रमाण वाढवून उत्पन्नात भर घातली आणि दुसऱ्या मार्गाने जीवनोपयोगी वस्तूंचे भावनियंत्रण करून त्या अल्प किमतीत सर्वसाधारण लोकांना सहज मिळतील अशी व्यवस्था केली. अलाउद्दीनाचे भावनियंत्रण ही त्या काळातील अत्यंत नाविन्यपूर्ण व आश्चर्यकारक घटना होती. त्यावरून अलाउद्दीन हा धाडसी अर्थशास्त्रज्ञ होता असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

अलाउद्दीनास अर्थशास्त्रातील 'मागणी व पुरवठ्या'च्या नियमांची माहिती असावी. त्याने असा कायदा केला की, प्रत्येक शेतकऱ्याने आपले धान्य सरकारने नेमलेल्या व्यापाऱ्यास निश्चित केलेल्या दराने विकावे. मालाच्या देवाणघेवाणीकरिता दिल्लीत 'सराय ए-आदल' (कापड बाजार) व 'शहना-ए-मंडी (धान्य बाजार) या नावाच्या दोन बाजारपेठा वसविण्यात आल्या. व्यापाऱ्यांना सरकारतर्फे अन्नधान्याचा निश्चित कोटा देण्यात येई. राजधानीतील लोकांना आपली नावे व्यापाऱ्याकडे नोंदविल्यावरच ठराविक प्रमाणात धान्य मिळत असे. अमीर-उमराव व उच्च पदाधिकारी यांना मौल्यवान वस्तूंच्या खरेदी-विक्रीकरिता शहना-ए-मंडी या अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागे. त्या काळी बाजारात वस्तूंचे दर पुढीलप्रमाणे होते-

| वस्तू | किंमत | वजन |
|---|---|---|
| गहू | ७॥ जीतल | १ मणास |
| तांदूळ | ५ ,, | १ ,, |
| डाळ | ५ ,, | १ ,, |
| तूप | १ ,, | १॥ शेर |
| साखर गुळ | १ १/३ जीतल | १ शेर |
| (मलमल बारीक) | १ टंका | २० वार |
| उत्तम घोडा | १०० ते १२० टंका | |
| दुभती गाय | ३ ते ४ टंका | |
| दुभती म्हैस | १० ते १२ टंका | |
| शेळी-मेंढी | १० ते १४ जीतल | |
| सुंदर-दासी | २० ते ४० टंका | |
| घरकाम करणारा गडी | १० ते १५ टंका | |

(श्री. रिजवी यांच्या मतानुसार एक जीतल एक पैशाबरोबरीचा तर एक टंका एक रुपयाच्या बरोबरीचा होता.)

बाजाराची सर्व व्यवस्था उत्तम रीतीने चालण्याकरिता 'मुमालिक-ए-रियासत' नावाच्या एका विभागाची निर्मिती करण्यात आली. या पदावर याकूब नाजीर याची



Scanned with CamScanner

नेमणूक करण्यात आली. भावनियंत्रक कायदे नीट पाळण्यात येतात किंवा नाही यांची चौकशी करण्याकरिता गुप्तहेर (मुनहियान) व बरीद बाजारात फिरत असत. वस्तू कमी तोलणाऱ्या व्यापाऱ्याच्या शरीरातून तेवढेच मास काढण्यात येई. खोटी वजने-मापे बाळगणाऱ्यास किंवा काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्यास फटके मारण्याची कडक शिक्षा दिली जात असे. ही योजना फक्त दिल्ली व दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशाला लागू होती, संपूर्ण भारतात नव्हे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

अलाउद्दीनाचे बाजारनियम व वस्तुनियंत्रणाचे कायदे जरी चांगले असले तरी ते समाजातील सर्व थरातील लोकांना (शेतकरी, व्यापारी व सरदार वर्ग इ.) जाचक असल्याने कोणासही आवडले नाहीत. या जुलमी नियमांमुळे व्यापारव्यवसायांची फार मोठी हानी झाली. त्याच्या मृत्यूनंतर अल्पावधीतच ही अवस्था कोलमडून पडली.

**अलाउद्दीनाचा मृत्यू (२ जानेवारी इ. स. १३१६) :** अलाउद्दीनास आपल्या सर्व उद्देशात कल्पनातीत यश मिळाल्याने त्यास सत्तेचा भयंकर मद चढला. दिवसेंदिवस तो अत्यधिक मद्यपी चैनी व विलासी होऊ लागला. सर्व लोकांबद्दल त्याला संशय येऊ लागला. मलिक काफूरच्या चिथावणीवरून त्याने आपली ज्येष्ठ पत्नी व तिचा मुलगा खिजरखान यांना कैदेत टाकले. वृद्धापकाळातील स्वैराचारी जीवनामुळे तो अत्यंत दुर्बल झाला. सर्व सत्ता काफूरने आपल्या हातात घेतली. साम्राज्यात ठिकठिकाणी बंडे होऊ लागली. अशा दुःखमय परिस्थितीत २ जानेवारी इ. स. १३१६ रोजी अलाउद्दीन मरण पावला.

### अलाउद्दीनाची राजसत्तेसंबंधी कल्पना

अलाउद्दीनाचा समकालीन इतिहासकार व तारीखे फिरोजशाहीचा लेखक झियाउद्दीन बरनीने अलाउद्दीन व दिल्लीचा काजी मुगिसुद्दीन अला-उल्-मुल्कमध्ये विविध राजकीय धोरणांसंबंधी जी चर्चा झाली तिचे सविस्तर वृत्त दिले आहे. त्यावरून अलाउद्दीनच्या राजसत्ताविषयक कल्पनांचे आपणास ज्ञान होते. म्हणून ती चर्चा येथे थोडक्यात देत आहोत. या चर्चेत सुलतानाने आपल्या अधिकारांविषयी काजीला प्रश्न विचारलेले आहेत आणि काजीने त्यांची उत्तरे भीतभीत परंतु निस्पृहपणे दिलेली आहेत. अलाउद्दीनाने पहिला प्रश्न विचारला की, "इस्लामी राज्यात गैर मुसलमान प्रजेची स्थिती काय असावी ?" त्यावर काझी असे उत्तर देतो की, "इस्लामसाठी हिंदूंना अपमानित करणे नितांत आवश्यक आहे कारण, ते मुस्तफाचे कट्टर शत्रू आहेत. मुस्तफा अलहिस्सलामने हिंदूंच्याबाबत अशी स्पष्टपणे आज्ञा दिली आहे की, "त्यांचा वध करावा, त्यांची संपत्ती लुटावी, त्यांना कारागृहात डांबावे, जर त्यांनी इस्लामचा स्वीकार केला नाही, तर त्यांची हत्या करून त्यांची संपत्तीसुद्धा जप्त केली जावी." अलाउद्दीनाने यावर असा विचार प्रकट केला की, हिंदू अवज्ञा करणारे आहेत व ते अत्यंत थाटामाटात जीवन व्यतीत करतात. म्हणून त्याने असे नियम केले की, ज्यामुळे हिंदूंची सर्व शानशौकत त्यांच्या राजवटीत समाप्त झाली. सुलतानाने यानंतर लाचलुचपतखोर राजसेवकांबाबत शराचा काय आदश आहे याची काझीला पृच्छा केली. या दुसऱ्या प्रश्नाचे समाधान करताना काजीने असे म्हटले की, लाचखोरांना कोणत्या



शिक्षा द्याव्यात याबद्दल कोठेच उल्लेख आढळत नाही. त्यांना शिक्षा करणे सर्वस्वी सुलतानाच्या इच्छेवर अवलंबून आहे' त्यावर अलाउद्दीन असे म्हणतो की, 'त्याने भ्रष्टाचाराचा बंदोबस्त करून सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढविलेले आहेत, त्यामुळे त्यांच्यातील लाच घेण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे' अलाउद्दीनाने काझी मुगिसुद्दीनाला तिसरा प्रश्न असा टाकला की, 'जी संपत्ती त्याने अनेक संकटे सोसून लढायात रक्तपात करून प्राप्त केलेली आहे. त्यावर सुलतानाचा अधिकार असणे कितपत योग्य आहे?" तसेच बैतुलमाला (राजकोषा) वर सुलतानाच्या आणि त्याच्या मुलांच्या अधिकारांबद्दल शराची काय आज्ञा आहे ? यावर काझीने उत्तर दिले की, ही सर्व संपत्ती प्रामाणिकपणे मिळविलेली नाही. राजकोषातून तेवढीच रकम सुलतान घेऊ शकेल जेवढी त्याने अन्य सैनिकांकरिता निश्चित केली असेल. अलाउद्दीनाचा शेवटचा प्रश्न असा होता की, "बंडाचे निर्मूलन, मद्यपान निषेध, राजकर्मचाऱ्यांवर कठोर नियंत्रण, आर्थिक शोषण, बंडखोराचे क्रूरपणे दमन व राजकराची कठोर वसुली इ. च्या उचित अनुचिततेसंबंधी काझीचे काय मत आहे?" यावेळी मात्र काजी खरोखरच अत्यंत घाबरला. तरीही त्याने असे उत्तर दिले की, "तुम्ही मला तुरुंगात ठेवा अथवा माझ्या शरीराचे लहानलहान तुकडे करा, तरीही मी असे म्हणेन की, तुम्ही केलेले कार्य शरीयतच्या विरुद्ध आहे." यावर आपल्या कृत्याचे समर्थन करताना सुलतान म्हणाला की, "मला कळत नाही की, मी दिलेल्या आज्ञा शरीयतच्या अनुकूल अथवा प्रतिकूल आहेत. राज्याच्या हिताच्या दृष्टीने किंवा संकटकालीन परिस्थितीत मला जे योग्य दिसेल तेच करण्याची मी आज्ञा देतो, कारण, त्यातच राज्य आणि जनतेचे हित असते असा मला विश्वास वाटतो, परिस्थितीनुरूप मला जे योग्य दिसेल तेच करण्याची मी आज्ञा देतो. मग भलेही माझ्या कृत्याला धर्मग्रंथांचा आधार असो वा नसो, कयामतच्या दिवशी माझ्या कृत्याबद्दल ईश्वर मला कोणती शिक्षा देईल याची मला मुळीच पर्वा नाही."[1]

अलाउद्दीन व काझी मुगिसुद्दीन अला-उल मुल्कच्या चर्चेवरून आपणास सुलतानाच्या राजसत्ताविषयक कल्पनेचे ज्ञान होते. त्यातून असा निष्कर्ष काढता येईल की, अलाउद्दीनाने धर्म व राजकारणाची फारकत केलेली होती त्याच्या पूर्वी झालेल्या सुलतानांनी धर्माचा राज्यावर पगडा राहू देण्यातच धन्यता मानलेली होती. इतर सुलतानांप्रमाणे अलाउद्दीनाने खलिफाकडून राजवस्त्रे मागविली नव्हती. तरीही तो स्वतःला खलिफाचा साहाय्यक म्हणवीत असे. हिंदू प्रजेविषयी शासक म्हणून आपली काहीच जबाबदारी नाही अशी त्याची ठाम समजूत होती. एकूण राजसत्तेबद्दल अलाउद्दीनाच्या कल्पनाही गुलामवंशी सुलतान बलबनप्रमाणेच होत्या. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे, त्याची इच्छा म्हणजेच

---

[1] " I do not know whether this is lawful, whatever I think to be for the good of the State or apportune for the emergeney that I decree and as far, what may happen to me on the day of judgement, that I know not." Jia-ud-din Barni–Tarikh-e-Firoz Shahi.



Scanned with CamScanner

कायदा आहे अशी त्याची समजूत होती. राजाची बरोबरी अन्य कोणीही करू शकत नाही. राजसत्तेला सगेसोयरे वा नातेवाईकांचे वावडे असते. (Kingship knows no kinship). राज्यातील सर्व लोक एकतर सुलतानाचे सेवक असतील वा प्रजाजन म्हणूनच राहू शकतील, अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. बलबनने तुर्की अमीरांचा राजकारणावरील पगडा दूर केला तर अलाउद्दीनाने सरदारांसमवेतच उलेमा वर्गाचीही राजकारणातील ढवळाढवळ बंद केली. अशारीतीने अलाउद्दीनाने बलबनच्या राजसत्तेच्या सिद्धांताला विस्तृत व विकसित रूप देऊन भारतातील मुसलमानी राजपदाच्या इतिहासात मोलाची भर घातली होती. धर्मातीत राज्यसंस्था स्थापन करणारा अलाउद्दीन हा दिल्लीच्या सुलतानशाहीतील पहिला सुलतान होता असे डॉ.के एस्.लाल यांचे मत आहे. तो काळ पाहता अलाउद्दीनाचे हे धाडस निःसंशय प्रशंसनीय होते, यात तिळमात्र शंका नाही.

योग्यता : अलाउद्दीन निःसंशय एक महान सुलतान होता. चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रकारच्या गुणांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वात समुच्चय झाला होता. तो एक प्रथितयश योद्धा आणि कुशल राज्यकर्ता होता. दक्षिण भारतात इस्लामचा विजयी ध्वज फडकविणारा तो पहिला सुलतान होता. मानवी स्वभावाची त्याला उत्तम पारख होती. निरनिराळ्या व्यक्तींकडून मोठमोठी कार्ये करवून घेण्याची हातोटी त्यास उत्तमपणे साधली होती. नुसरतखान, अलपखान, जाफरखान, उलूघखान, मलिक काफूर व गाझी मलिक हे शूर सरदार त्याच्या तालमीत तयार झाले होते. म्हणूनच तो पंजाब ते रामेश्वर आणि सिंध ते बंगालपर्यंत पसरलेले विशाल भारतीय साम्राज्य स्थापन करू शकला. सुलतानाच्या धार्मिक विचारांबद्दल काही जण संभ्रमात पडतात. सुलतानाचा परमेश्वरावर विश्वास होता, कर्मकांडावर नव्हे. तो नमाज पढत नसे. पण मुल्ला मौलवींबद्दल त्याला आदर वाटे शेख निजामुद्दीन औलियाबद्दल त्याला अत्यंत आदर व श्रद्धा होती. कमलादेवी व देवगिरीच्या हिंदू राजकन्येशी लग्न करूनही त्याच्या हिंदूविषयक धोरणात काही फरक पडला नाही.

अलाउद्दीन जरी निरक्षर होता तरी त्यास साहित्य व कलेचे वावडे नव्हते. तत्कालीन सुप्रसिद्ध कवी अमीर खुसरो, अमीर हसन देहलवी हे त्याच्या दरबारी होते. अमीर खुसरो हा तत्कालीन सर्वश्रेष्ठ गायक, संगीतज्ञ, इतिहासकार, कवी व तत्त्ववेत्ता होता. अलाउद्दीनास स्थापत्यकलेची आवड होती. त्याने दिल्लीजवळ 'सीरी' नावाचे नवीन शहर वसविले. या नगरात हजार सितून महाल व हौज-ए-अलाई या दोन भव्य वास्तू त्याने निर्माण केल्या होत्या.

अलाउद्दीनाचे व्यक्तिगत जीवन अत्यंत दुषित होते. तो अतिशय निर्दयी, कपटी, संशयी, कावेबाज व स्वार्थी होता. स्वहेतुसिद्धयर्थ नीति-अनीतीची चाड न बाळगता कोणतेही कृत्य करावयास तो मागे पुढे पाहत नसे कृतज्ञतेच्या भावनेचा त्याच्यात लवलेशही नव्हता. युद्ध आणि रक्तपात या मार्गाचा तो अंध उपासक होता.



अलाउद्दीनाच्या योग्यतेबद्दल विद्वानात मतभेद आहेत. एल्फिन्स्टनच्या मते, 'त्याची कारकीर्द यशस्वी' होती. स्टॅन्ले लेनपूल लिहितो, "जरी तो रक्तपिपासू व निर्दय शासक होता तरी तो एक शक्तिशाली व योग्य शासक होता हे कोणीही नाकबूल करणार नाही." तर डॉ. व्हिन्सेंट स्मिथच्या मते, "अलाउद्दीन एक जुलमी व रानटी राजा होता. त्यास न्यायनीतीची चाड नव्हती." दोन्ही दृष्टिकोन आमच्या मतानुसार अतिशयोक्तिपूर्ण आहेत. दिल्लीच्या सुलतानांमध्ये अलाउद्दीनास निःसंशय सर्वश्रेष्ठ स्थान द्यावे लागेल.

**अलाउद्दीन हा सुलतानशाहीतील शासकवर्गात सर्वश्रेष्ठ होता काय ? :** यासंबंधी आधुनिक इतिहासकारांच्या मतात बरीच तफावत आढळून येते. एल्फिन्स्टन महोदयांनी त्याच्या कारकीर्दीवर यशस्वितेचा शिक्का मारला आहे. तर स्मिथ महोदयांनी त्याच्या कारकीर्दीस गौरवहीन मानले आहे. अभ्यासाच्या दृष्टीने हा वाद अतिशय उद्बोधक असल्याने त्यासंबंधीचा खुलासा थोडक्यात खाली देत आहोत.

अलाउद्दीन सुलतानशाहीच्या इतिहासात सर्वश्रेष्ठ होता. तो अत्यंत महत्त्वाकांक्षी, साहसी, कणखर इच्छाशक्तीचा, असामान्य योद्धा व कुशल सेनापती होता. साम्राज्यविस्तार व लष्करी विजयात सुलनानशाहीतील कुणीही सुलतान त्याची बरोबरी करू शकणार नाही. दक्षिण भारतात कन्याकुमारीपर्यंत मुसलमानी सत्तेचा विस्तार करणारा तो पहिला सुलतान होता. संपूर्ण हिंदुस्थानात त्याने एकछत्री अंमल स्थापन केलेला होता. वायव्येकडून सतत होणारी मंगोल आक्रमणे थोपवीत त्याने हे प्रचंड कार्य केले होते. निव्वळ या दोन्ही गोष्टी सुलतानवर्गात त्याला सर्वश्रेष्ठ स्थान देण्यास पुरेशा आहेत. अलाउद्दीनाचे दंडविधान कठोर होते. चोरी, डाके, जाळपोळ व लुटालूट यांपासून त्याने प्रजेचे संरक्षण केले होते. त्याच्या वीस वर्षांच्या कारकीर्दीत सर्वत्र शांतता, सुव्यवस्था व राजकीय स्थैर्य नांदत होते संपूर्ण भारतात राजकीय ऐक्याची स्थापना करणारा तो पहिला सुलतान होता केंद्रीय व प्रांतीय राज्यकारभारात अन्योन्य संबंध स्थापून त्याने शासनाला एकजिनसी बनविले होते. हेही कार्य अन्य कोणत्याच सुलतानाला साधले नव्हते. स्थायी सेना, भूराजस्वाची पद्धत, भावनियंत्रण व दक्षिणविजय ही कार्ये नव्याने संपादन करणारा तो पहिला सुलतान होता, त्याच्या भावनियंत्रण योजनेमुळे रयतेला अन्नवस्त्राची ददात नव्हती. स्थायी सैन्यपद्धतीमुळे देशाचे अंतर्गत व बाह्य संकटांपासून संरक्षण झाले होते. ही भरीव कामगिरी संपादन करण्याची कुवत अन्य सुलतानात नव्हती. डॉ. लालच्या मतानुसार धर्मातीत राज्याची स्थापना करणारा अलाउद्दीन हा दिल्लीचा पहिला सुलतान होता. बलबनने राजसत्तेवरील तुर्की सरदारवर्गाचा पगडा दूर केला होता, तर अलाउद्दीनाने सरदारांसमवेतच उलेमा वर्गाचीही राजकारणातील ढवळाढवळ बंद केली होती. अलाउद्दीनाची सुलतानशाहीतील सर्वांत प्रशंसनीय कामगिरी म्हणजे त्याने धर्म व राज्याची फारकत करून राज्याला धर्माच्या प्रभावातून मुक्त केले होते. महंमद तुघलकाचा अपवाद सोडता दिल्लीच्या सुलतानांचे राज्य हे 'धर्मराज्य' होते. अलाउद्दीनाने निर्माण केलेल्या व्यवस्थेचे अनुकरण पुढील काळात शेरशहा व अकबरनेही केलेले होते. जरी तो निरक्षर होता, तरी त्याने साहित्य व कलांना भरीव आश्रय दिलेला होता. मोठमोठे कवी,

इतिहासकार व साहित्यिक त्याच्या दरबारी होते. एकूण दिल्ली सुलतानात त्याची बरोबरी फक्त अल्तमश, बलबन व महंमद तुघलकच करू शकतात. परंतु या सर्वांच्याच कारकीर्दीचे चिकित्सक दृष्टीने मूल्यमापन केले तर अलाउद्दीन हा सर्वच बाबतीत मोठा होता असे आपल्याला मानावे लागेल. लष्करी विजय, साम्राज्यविस्तार, सुसंघटित शासन, सुलतानपदाची महती, परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण व अंतर्गत शांततेची स्थापना इ. सर्वच क्षेत्रांत अलाउद्दीनाची बरोबरी कुणीही सुलतान करू शकणार नाही. म्हणूनच त्याला दिल्ली सुलतानशाहीतील सर्वश्रेष्ठ सुलतानाची पदवी देणे योग्य होईल.

अलाउद्दीन दिल्लीच्या सुलतानशाही राजवटीतील सर्वश्रेष्ठ सुलतान नव्हता, हे मत प्रतिपादन करणाऱ्या लोकांनी यासंबंधी आपली मते प्रकट केलेली आहेत. हा लेखक वर्ग असे म्हणतो की, अलाउद्दीन हा जुलमी, स्वेच्छाचारी व निरंकुश सुलतान होता. अलाउद्दीनचा समकालीन विद्वान शेख बशीरने असे लिहिले आहे की, "अलाउद्दीनच्या राज्याला स्थायित्व मिळण्यासाठी बळकट आधार नव्हता. खिलजी घराण्याच्या विनाशाचे प्रमुख कारण त्याच्या शासनव्यवस्थेत स्वाभाविक दोष होते." जदुनाथ सरकारच्या मतानुसार, अनियंत्रित व स्वेच्छाचारी शासन स्वभावतःच अनिश्चित व अस्थायी असते. अलाउद्दीनाच राज्यकारभार लष्करी बळावर चाललेला होता. ज्या राज्यकारभाराला लोकप्रियतेचा पाठिंबा नसतो तो राज्यकारभार दीर्घकालपर्यंत कधीच चालत नसतो. स्वभावाने तो अत्यंत क्रूर, अत्याचारी व निर्दयी होता. लहानसहान गुन्ह्यांसाठी तो अंगभंगाच्या विलक्षण कठोर शिक्षा देत असे त्याचे खाजगी जीवन अत्यंत गलिच्छ व अनैतिक होते. स्वतःच्या स्वार्थपूर्तीकरिता आपल्या अगदी निकटच्या लोकांना बळी देण्यासही तो मागेपुढे पहात नसे. राज्यप्राप्तीसाठी त्याने पित्यासमान प्रेमळ काकाचाही निःसंकोचपणे वध केला होता. हिंदूंशी त्याने केलेल्या व्यवहाराला शब्दरूप देणे अतिशय कठीण आहे. त्याच्या कारकीर्दीत हिंदू प्रजा दीन, दुबळी व अक्षरशः कंगाल झाली होती. त्याने केलेल्या सुधारणा जरी चांगल्या असल्या तरी त्या सुधारणांची निर्मिती आपला स्वार्थ साधण्यासाठीच केली होती असे म्हणावे लागेल. त्यामुळेच त्याच्या कारकीर्दीस जनतेने पाठिंबा कधीच दिला नव्हता. त्याचे प्रामाणिक व स्वामिभक्त सेवक मरण पावताच त्याच्या साम्राज्याचा ऱ्हास झाला. अलाउद्दीनाने अत्यंत खालच्या जातीच्या लोकांना राज्यकारभारात वाव देऊन त्यांचे महत्त्व वाढविले होते. उदाहरणार्थ, मलिक काफूर याने तर स्वतःच सुलतान बनण्याची मनस्वी खटपट केली होती. अलाउद्दीनाने प्रचंड साम्राज्य सांभाळण्याची धमक आपल्या पुत्रांमध्ये निर्माण केलेली नव्हती. त्यामुळे तो मरण पावताच खिलजी साम्राज्य लवकरच इतिहासाच्या कालात विलीन झाले.

वरील दोन्ही वैचारिक प्रणालींचा चिकित्सकपणे विचार करता दोन्ही मते अतिशयोक्तिपूर्ण वाटतात. ज्या काळात व ज्या परिस्थितीत अलाउद्दीनाला राज्य चालवावे लागले तो काळ व तत्कालीन परिस्थितीनुरूपच तो वागलेला होता. आपले उद्दिष्ट मात्र त्याने साध्य केलेले होते यात शंका नाही. त्यामुळे भारताच्या महान सम्राटात किंवा



सुलतानशाहीच्या महान शासकात त्याला उच्च व मानाचे स्थान देणे योग्य होईल असे आम्हास वाटते.

मलिक काफूर : अलाउद्दीनाच्या या शूर सेनापतीचा जन्म गुजरायेत एका हिंदु कुटुंबात झाला होता. इ. स. १२९९ मध्ये गुजराथ जिंकणाऱ्या नुसरतखान व उलुघखान या अलाउद्दीनाच्या सेनापतींनी मोहिमेवरून परतल्यावर त्याला सुलतानाला नजर केले. देखणेपण, हजरजबाबीपणा, बुद्धिमत्ता व शौर्य इ. गोष्टींमुळे लवकरच त्याच्यावर अल्लाउद्दीनाची मर्जी बसली. सुलतानाच्या आदेशावरून काफूरने दक्षिण भारतावर इ. स. १३०६ ते १३१३ पर्यंत चार वेळा स्वाऱ्या करून तेथील देवगिरी, वारंगळ, द्वारसमुद्र व मदुरा ही राज्ये जिंकून तेथून प्रचंड लूट दिल्लीला आणली. दक्षिण भारतातील सुलतानाच्या सत्ताविस्ताराचे सर्व श्रेय काफूरच्या शौर्य व मुत्सद्देगिरीलाच आहे. त्यामुळे तर तो दिवसेंदिवस सुलतानाच्या अधिक विश्वासाला पात्र झाला. वाढते वय व मद्यपान आणि अन्य व्यसनांमुळे सुलतान दिवसेंदिवस अधिकाधिक क्षीण होत असलेला पाहून काफूरच्या महत्त्वाकांक्षांना पालवी फुटली. त्याच्या सांगण्यावरून सुलतानाने आपली ज्येष्ठ पत्नी मलिका-ए-जहां व राजपुत्र खिजरखां आणि शादीखां यांना कैदेत टाकले आणि अलपखान (मलका-ए-जहानचा भाऊ) याला गुप्तपणे ठार मारले. काफूरच्या सल्ल्यावरून सुलतानाने शहाबुद्दीन उमर या अल्पावयीन राजपुत्राला आपला वारस नेमले इ स १३१६ मध्ये अलाउद्दीनाचा मृत्यू होताच काफूरने त्याच्या विधवा पत्नीशी लग्न केले व तिच्या ५–६ वर्षांच्या मुलाला—शहाबुद्दीन उमरला—नवीन शासक व स्वतःला त्याचा संरक्षक जाहीर करून राज्यकारभाराची सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. त्याने राजपुत्र खिजरखान व शादीखानचे डोळे काढून त्यांना आंधळे केले. राजपुत्र मुबारक मात्र काफूरच्या पकडीतून सुरक्षितपणे निसटला. काफूरने आपल्या अनेक विरोधकांना अशाच क्रूरपणे मार्गातून दूर केले. शेवटी राजपुत्र मुबारकाने आपल्या साहाय्यकांसह एके दिवशी मलिक काफूरच्या महालात प्रवेश करून त्यास ठार मारले. अशा रीतीने मलिक काफूरच्या ३५ दिवसांच्या क्रूर व रक्तरंजित राजवटीचा अंत झाला.



Scanned with CamScanner